# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** पुणे ग्रामीण **P.S.(ठाणे):** भोर
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0114 **Year (वर्ष):** 2026
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**20/05/2026 02:56

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** दरमियानी दिन **Date From (दिनांक पासून):** 06/04/2026
**Time Period (कालावधी):** **Date To ( दिनांक पर्यंत):** 19/05/2026
**Time From (वेळेपासून):** 12:30 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 13:07 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 20/05/2026 **Time (वेळ):** 02:36 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 003
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 20/05/2026 02:36 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
उत्तर, 5 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** मौजे शिंद ग्रामपंचायत कार्यालय, किवत गावचे हद्दीत महुडे भोर रो,लगत आंब्याचे झाडाखाली

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**



Scanned with CamScanner

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): आसावरी जगन्नाथ शेडगे पोलीस निरीक्षक

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1990

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे,भोर,पुणे ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे,भोर,पुणे ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-8425808058

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | महादेव नामदेव सालगुडे ग्रामविकास अधिकारी ग्रामपंचायत शिंद ता भोर जि पुण | | | 1. राजतेज सोसायटी सी विंग, 07वा ,माळा भोलावडे ता भोर जि पुणे,भोर,पुणे ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |
| 2 | किसन रामचंद्र ठोसर | | | 1. शिद ता भोर जि पुणे,भोर,पुणे ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |
| 3 | दत्तात्रय दादा खंडाळे सेवानिवत्त विस्तारअधिकारी | | | 1. श्रीकष्ण अपार्टमेंट ई विंग ,फ्लॅट नं100रुई रोड बारामती ता, भोर,पुणे ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |



Scanned with CamScanner

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)** (चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

11. **Inquest Report / U.D. case No., if any** (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

मी आसावरी जगन्नाथ शेडगे,वय-36 वर्षे व्यवसाय नोकरी,पद-पोलीस निरीक्षक,लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे मो.नं.8425808058.

मी वरील प्रमाणे असुन लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे येथे पोलीस निरीक्षक म्हणुन कार्यरत आहे. दि. 06.04.2026 रोजी सकाळी 07.49 वाजता प्रशासन अधिकारी श्री.दयानंद गावडे,पोलीस उपअधीक्षक,ला.प्र.वि. पुणे यांनी आम्हास फोन करुन कळविले कि,तक्रारदार यांची लाच मागणी होत असलेबाबतची तक्रार असून आपण सदर तक्रारदार यांना संपर्क करुन त्याप्रमाणे पुढील कायदेशीर कारवाई करा असे आम्हास आदेशित करुन पुढील कारवाईसाठी तक्रारदार यांचा संपर्क क्रंमाक दिला तसेच मदतीकरीता पोशि 2845/विकास आडके,पोशि/3037 माने चालक पो.हवा काकडे व शासकिय वाहन सुमो गाडी क्र.एमएच 12एनयु5882 हे दिले असल्याचे सांगितले तसेच पंच म्हणून श्री.वैभव चंद्रकांत खाडे,वय - 39 वर्षे,व्यवसाय –नोकरी,पद- बिनशेती भुकरमापक नेमणुक–नगर भुमापन अधिकारी क्र.1रा.ए/202,कोहिनुर जीवा, बिबवेवाडी पुणे नगर भुमापन अधिकारी कार्यालयाचे पंच श्री. अनिल राजाराम बांदल, वय- 44 वर्षे, व्यवसाय – नोकरी, पद- शिपाई, नेमणुक -नगर भुमापन अधिकारी क्र.02 विभाग, पुणे रा.मु.पो.खडकी ता. भोर जि. पुणे यांचे संपर्क क्रंमाक दिले.त्याप्रमाणे आम्ही तक्रारदार यांचे मोबाईल फोनवर संपर्क केला असता तक्रारदार यांनी त्यांचे नाव अरविंद अर्जून सूर्वे असल्याचे सांगून भोर येथे येण्यास सांगून त्याठिकाण्ी तक्रार सांगतो असे सांगितले.त्यानंतर आम्ही दोन्ही पंचाना संपर्क करुन लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे येथे आमचे कक्षात 10.00वाजता हजर राहणेबाबत कळविले.त्यानुसार दि.06/4/2026 रोजी नमुद दोन्ही पंच आमचे कक्षात सकाळी 11.30 वाजता हजर झाले.त्यानंतर आम्ही दोन्ही पंचांना आमची व सापळा पथकाची ओळख करुन दिली तसेच तक्रारदार श्री.सूर्वे हे भोर येथे थांबलेले असून त्यांनी तेथे बोलाविले असल्याचे सांगितले. त्यानंतर आम्ही पंच साक्षीदार यांना तक्रारदार यांची लोकसेवकाविरुध्द लाच मागणी होत असलेबाबतची तक्रार असून त्यांची तक्रार नोंदवून त्याप्रमाणे पुढील कारवाई करणे आहे त्याकामी आपण पंच साक्षीदार म्हणून उपस्थित राहून काम करणेस तयार आहात का अशी विचारणा करता त्यास नमुद दोन्ही पंच साक्षीदार यांनी होकार दिला.

त्यानंतर आम्ही वर नमुद शासकिय वाहनामधुन पडताळणी व सापळा कारवाईकामी लागणारे साहित्य घेवून लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय पुणे येथून बाहेर पडुन भोर येथे पोहचलो सदर ठिकाणी तक्रारदार थांबले होते आम्ही तक्रारदारसह कोणासही संशय येणार नाही अशाठिकाणावर पोहचलो.आम्ही तक्रारदार यांना शासकिय वाहनात घेतले सदरवेळी तक्रारदार श्री.सूर्वे व नमुद दोन्ही पंच यंाची एकमेकांची ओळख करुन दिली तसेच सापळा पथकातील अधिकारी अंमलदार यांची ओळख करुन दिली.त्यानंतर तक्रारदार यांनी त्यांची तक्रार प्रथम तोंडी कथन केली व नंतर लेखी स्वरुपात दिली ती पुढीलप्रमाणे.

मी " श्री.अरविंद अर्जुन सुर्वे,वय56वर्षे,धंदाशेती,रा.गवडी पो.शिंद, ता. भोर जि. पुणे मो.नं.9763520523मी वरील प्रमाणे असुन नमुद पत्त्यावर माझे कुटंुबासह राहण्यास आहे.मी शेती व्यवसाय करुन कुटुंबाचा उदनिर्वाह करतो सन 2024/2025 मध्ये मला महाराष्ट्र शासन तर्फे घरकुल मंजुर झाले आहे. माझा घरकुल कोड एम.एच. 120639778 आहे. दि.28/2/2025 रोजी मला माझ्या पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित पुणे चे



Scanned with CamScanner

खाते क्रंमाक 012001700013781 या खात्यामध्ये घरकुल मंजुरीचा पहिला हप्ता 15,000/-रुपये जमा झाला आहे.त्यानंतर मी घराचे बांधकाम सुरु करुन फाऊंडेशन पुर्ण केले त्यानुसार माझ्या गावचे ग्रामसेवक महादेव सालगुडे यांनी माझ्या घराच्या बांधकामाचे इंजिनिअर मार्फत फोटो काढुन घरकुलाच्या दुस¬या हप्त्याकरीता मागणीपत्र पंचायत समिती भोर येथे पाठविले.

दि.01/04/2026 रोजी मी पंचायत समिती भोर येथे माझ्या घरकुलाच्या दुस-या हप्त्याबाबत चौकशी करण्याकरीता गेले असता. त्याठिकाणी मला क्लर्ककडून माझा हप्ता ग्रामसेवक महादेव सालगुडे यांनी प्रलंबित ठेवण्यास सांगितले असल्याचे समजले म्हणुन मी सदर दिवशी ग्रामसेवक महादेव सालगुडें यांची भेट घेऊन माझा हप्ता प्रलंबित ठेवण्याचे कारण विचारले असता त्याने माझ्या घरकुलाचा दुसरा हप्ता खात्यामध्ये जमा करण्याकरीता 5000/-रुपयाची मागणी केली. ग्रामसेवक महादेव सालगुडे यांनी मागणी केलेली 5,000/- रक्कम ही लाचेची रक्कम असल्याचे माझी खात्री झाल्याने व त्यांना लाच देण्याची माझी इच्छा नसल्याने मी ग्रामसेवक महादेव सालगुडे यांच्या विरोधात कायदेशीर कारवाई होण्याकरीता आज रोजी तक्रार देत आहे."अशा आशयाच्या तक्रारीवर आम्ही व पंच साक्षीदार यांनी वाचून त्यावर सहया केल्या.सदर पडताळणी कारवाईदरम्यान पंच क्र.1 म्हणुन श्री. अनिल बांदल, व पंच क्र. 02 म्हणुन श्री.वैभव खाडे हे काम करतील असे आम्ही ठरविले.त्यानंतर आम्ही तक्रारदार व पंचास शासकीय व्हाईस रेकॉर्डर दाखवुन त्याबाबत माहीती दिली. एक नवीन सिलबंद मेमरी कार्ड त्याचे वेस्टनातुन बाहेर काढुन त्याची सर्वासमक्ष पाहणी केली असता, त्याचे एका बाजुस EVM ELITE 32 GB MICRO SD HC CLASS C 10 IU3V30 व दुस¬या बाजुस MHH07CC0AYM-BG CMA03A01TMBC14BAT EETF32GBC0925 असे छापलेले असल्याचे दिसुन आले. मेमरीकार्ड त्यांचे वेस्टनातून बाहेर काढले ते व्हाईस रेकॉर्डरमध्ये घातले.इनबिल्ट मेमरीमध्ये व मेमरीकार्डमध्ये यापूर्वीची कोणतीही फाईल नसल्याचे पंच व तक्रारदार यांना खात्री करून दिली.तसेच निवेदन व सापळा कारवाईचे चित्रीकरण पोशि विशाल माने यांचेकडील मोबाईलमध्ये करण्यात येणार असलेचे सांगुन त्यांचा वन प्लस कंपनीचा मोबाईल दाखविला व त्याकरिता वापरण्यात येणारे नवीन मेमरी कार्ड दाखविले त्यावर एका बाजुस EVM ELITE 32 GB MICRO SD HC CLASS C 10 IU3V30 दुस¬या बाजुस MHH07CC0AYM-BG CMA03A01TMBC14BAT EETF32GBC0925 छापलेले असल्याचे दिसुन आले सदर मेमरी कार्ड वन प्लस या मोबाईलमध्ये बसवून त्यामध्ये पुर्वीचे कुठलेही चित्रीकरण नसल्यांची खात्री करून दिली.त्यानंतर व्हाईस रेकॉर्डर चालू करुन व्हिडीओग्राफीसह तक्रारदार श्री.सुर्वे यांचे निवेदन घेऊन त्यापाठोपाठ पंच क्र. 1 व 2 यांचे निवेदन घेवून तक्रारदार यांना पंच क्रं 1 यांचेसह लोकसेवक यांची भेट घेण्याकरीता त्यांची दूचाकी वाहन क्रं एमएच 12 एमएन 7955 यावरुन रवाना करण्यात आले परंतू लोकसेवक सालगूडे यांची भेट न झाल्याने तक्रारदार यांना पुढील कारवाई बाबत विचारणा करता तक्रारदार यांनी पुढील कारवाई मी आपणास संपर्क करेल त्यावेळी करण्यात यावी असे सांगितले त्यादिवशीची कारवाई स्थगित केली.सदर बाबत सविस्तर पंचनामा करणेत आला आहे.

त्यानंतर दि.07/04/2026 रोजी तक्रारदार यांनी आमच्या मोबाईल क्रंमाकावर संपर्क करुन लोकसेवक यांनी त्यांना दि.08/04/2026 रोजी भेटण्यास बोलाविले असल्याचे कळविलेवरुन आम्ही सापळा पथकास व पंचास सदरबाबत माहिती देवून दि.08/04/2025 रोजी सकाळी 10.00 वाजता लाप्रवि कार्यालयात हजर राहण्याच्या सुचना दिल्या.दिनांक 8/04/2026 रोजी पडताळणी कारवाई आजमावली असता लोकसेवक सालगूडे यांची भेट झाली नाही परंतू लोकसेवक सालगूडे यांनी फोनद्रवारे तक्रारदार यांना दि.09/04/2026 रोजी भेटण्यास बोलाविले असल्याने आम्ही तक्रारदारास व सापळा पथकास पुढील कारवाई दि.09/04/2026 रोजी करण्याण्याबाबत सुचना देवून त्यादिवशीची कारवाई स्थगित केली.सदरबाबत सविस्तर पंचनामा करणेत आला आहे.

आम्ही दिलेल्या सुचनेप्रमाणे दि.09/04/2026 रोजी दोन्ही पंच साक्षीदार व सापळा पथक असे सकाळी 07.00 वाजता ला.प्र.वि. पुणे कार्यालय येथे हजर झाले. त्यानंतर आम्ही सापळा कारवाईकामी आवश्यक असलेल्या साहित्यासह ला.प्र.वि. पुणे कार्यालयातुन 07.30वा शासकीय वाहन एम एच 12 एन यु 5882 ने रवाना होवून भोर-पासूरेवरंधा रोडलगत असलेल्या शेतातजवळ आडोशाला थांबून तक्रारदार यांना फोन करुन कळविले व *त्यानंतर थोडयाचवेळात तक्रारदार हे त्यांचे दुचाकीसह हजर झाले.आम्ही तक्रारदार यांना शासकीय वाहनात* बसविले. सदर ठिकाणावरून पुढील पडताळणी करण्याचे सर्वानुमते ठरवून आम्ही तक्रारदार, पंच साक्षीदार व सापळा पथक यांना पुढील पडताळणी कारवाईचे अनुषंगाने सुचना दिल्या.त्यानंतर आम्ही शासकीय व्हॉईस रेकॉर्डर काढून त्यामध्ये दि.06/04/2026 रोजीचे व दि.08/04/2026 रोजीचे पडताळणी कारवाई दरम्यान वापरण्यात आलेले मेमरीकार्ड पुढील पडताळणीकरीता सलग वापरण्यात येणार असल्याचे सांगुनआम्ही व्हॉईस रेकॉर्डर चालू करून 08.59वाजता त्यामध्ये तक्रारदार,पंच क्र.1 श्री.बांदल व पंच क्र.2 श्री.खाडे यांची पडताळणी निवेदन ध्वनिमुद्रीत केले व त्याचे व्हिडीओ चित्रीकरण केले.त्यानंतर तक्रारदार यांना लोकसेवक सालगुडे हे कोठे भेटतील



Scanned with CamScanner

याबाबत विचारणा केली तक्रारदार यांनी लोकसेवक सालगुडे यांचे भेटण्याचे निश्चित ठिकाण सांगता येणार नाही असे सांगितल्याने लोकसेवक सालगुडे यांना मोबाईलद्वारे संपर्क करुन माहिती घेण्याचे ठरवून शासकिय व्हाईसरेकॉर्डर चालू करुन तक्रारदार यांनी त्यांचा मोबाईल क्रं 9763520523 यावरुन लोकसेवक सालगुडे यांच्या मोबाईल क्रं 9657863613यावर संपर्क केला असता लोकसेवक सालगुडे यांनी भोरमधील हिंदूस्थान पेट्रोलपंप येथे तक्रारदार यांना भेटण्यास बोलाविले. त्यानंतर तक्रारदार यांची लाचमागणी पडताळणी कारवाईच्या अनुषंगानेतक्रारदार व पंच क्रं 1 बांदल यांना सुचना देवून व्हाईस रेकॉर्डर चालू करून तो तक्रारदार श्री.सुर्वे यांच्या शर्टच्या आतमध्ये बनियनला लावुन दिला व पंच क्र.01 श्री.बांदल यांचेसह दुचाकी वरुन पडताळणीकामी ग्रामसेवक सालगुडे यांची भेट घेण्याकरीताहिंदूस्थान पेट्रोलपंप येथे रवाना केले ती वेळ 9.18 वा ची होती.

त्यानंतर थोडया वेळाने तक्रारदार व पंच क्रं 1 हे सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी परत आले ती वेळ 09.47 वा ची होती.सदर वेळी व्हॉईस रेकॉर्डर बंद करुन आम्ही तक्रारदार यांना गेल्यापासुन येईपर्यंत काय झाले असे विचारले असता त्यांनी सांगितले की,मी व पंच क्र.01 बांदल हे हिंदूस्थान पेट्रोलपंप भोर येथे गेलो तेथे ग्रामसेवक सालगूडे त्याठिकाणी त्यांचे दूचाकी वरुन आले तेव्हा मी त्यांना "भाउसाहेब ते घरकूल हफत्याच पेंडीग ठेवल तेवढ सोडा" असे म्हणालो असता ग्रामसेवक सालगूडे यांना पंच क्रं 1 यांचेवर संशय आल्याने लोकसेवक त्याठिकाणाहून शिंदगावाकडे निघून गेले.त्यानंतर मी व पंच आपण थांबलेल्या ठिकाणी परत आलो.
परंतू लोकसेवक सालगुडे यांची भेट घेऊन लाचमागणी पडताळणी करणे आवश्यक होते व पंच क्रं 1 यांचेवर लोकसेवक सालगूडे यांना संशय आल्याने म्हणून पंच क्रं 1 यांचेएवजी पंच क्रं 2 यांनातक्रारदार यांचेसोबत ग्रामसेवक सालगूडे यांची भेट घेणेकामी पाठविण्याचे ठरविले त्यानंतर व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन तक्रारदार यांना लाऊन देऊन तक्रारदार यांना पंच क्रं 2 खाडे यांचेसह शिंद गाव येथे पडताळणीकामी 12.05वा रवाना केले त्यानंतर काही वेळाने तक्रारदार व पंच नं.02 असे आम्ही थांबलेल्या ठिकाणी परत आले.त्यावेळी आम्ही पोशि आडके यांचे मदतीने तक्रारदार यांचेकडील व्हाईस रेकॉर्डर बंद केला ती वेळ 12.40वा.ची होती. व तक्रारदार यांना इथून गेल्यापासून येईपर्यंत काय झाले याबाबत विचारले असता त्यावेळी तक्रारदार यांनी सांगितले की, मी पंच खाडे यांचे सह शिंद गावात गेलो असता शिंदगावात रोडलगत ग्रामसेवक सालगुडे हे मला भेटले तेव्हा मी ग्रामसेवक सालगूडे यांना म्हणालो काशीनाथचा फोन आलता सरपंचाचा तुम्हाला भेटाया त्यावर सालगूडे म्हणाले काय पाहिजे .. हे कोण माणुस आहे (पंच क्र. 02. यांना उददेशुन) त्यावर मी सालगूडे यांना हे साडुयत पुणेवाले असे म्हणालो तेव्हा ग्रामसेवक सालगूडे यांनी पंच क्रं 2 यांना थोडया अंतरावर थांबविले त्यानंतर मी सालगूडे यांना ऐकुण घ्या ना फक्त माझ एवढ काम करा तुम्ही असे म्हणालो असता सालगूडे हे "तुम्हाला होका काशीनाथ अप्पाशी बोलो 10 हजार द्या.. माझं नावच देऊ वाटल द्या नाहीतर नका देऊ.. तुम्हाला लगेच हाप्ता सोडायला सांगतो आज गेले की, आणि येताना एकट एकटेच गपचिप या कोणला आनु नका पावण रावळ"त्यावर मी सालगूडे यांना नाही तुम्हाला पाच त्याला पाच त्याला पाच अस म्हणलो शब्द माझा त्याता बदल नाय फक्त एक काम करा तुम्ही असे म्हणालो असता सालगूडे हे मला "मी तर म्हणतो माझ पाच नंतर द्या. फक्त 10 द्या.. त्याला मला लगेचा त्यांना ऑनलाईन पाठवाचयती"असे म्हणाले त्यावर मी सालगूडे यांना बघतोना मी काय हाय तेम्हणालो असता सालगूडे हे *मला ह.. बघा. अन मी बँकेत हाय. पीडीसी बँकेत. असे म्हणाले असता मी आपण थांबलेल्या ठिकाणी परत आलो.*
त्यानंतर आम्ही पंच क्र 2 यांना विचारणा केली असता त्यांनी तक्रारदांप्रमाणे हकिकत सांगितली.त्यानंतर पंचासमक्ष आज रोजीचे पडताळणी दरम्यान व्हॉईस रेकॉर्डरमधील ध्वनिमुद्रीत फाईल क्र.12 ही शासकीय लॅपटॉपवर कॉपी करून त्यामधील संभाषण ओपन साऊंड करून ऐकले असता ते तक्रारदार यांनी सांगितलेल्या हकिकतेप्रमाणे बरोबर असल्याची खात्री केली.
आम्ही तक्रारदार यांना लोकसेवक सालगूडे 10 हजार रुपयाची लाचेची मागणी कोणासाठी करत आहेत याबाबत विचारणा केली असता तक्रारदार यांनी आम्हाला सांगितले कि, "लोकसेवक सालगूडे हे सेवानिवृत्त विस्तार अधिकारी खडांळे व सेवानिवृत्त विस्तार अधिकारी गोगरे यांचेसाठी 10 हजार रुपयाची मागणी करीत असल्याचे सांगितले.परंतूसेवानिवृत विस्तार अधिकारी गोगरे यांनी त्यांच्याकडे घरकूलचा हफ़्ता सोडण्याकरीता कधीही लाचेची मागणी केली नसल्याचे सांगितले तसेच जानेवारी 2025 मध्येगवडी ग्रामस्थांनी तक्रारदार यांचेघरकूल अतिक्रमण गावठाणात येत असलेबाबतची तक्रार पंचायतसमिती भोर येथे केल्याने सदर तक्रारीची चौकशी सेवानिवृत्त खंडाळे यांच्याकडे होती.त्यावेळी खंडाळे यांनी तक्रारदाराकडेघरकूलाचा दूसरा हफता खात्यामध्ये जमा करण्याकरीता स्वत: करीता 5 हजार विस्तार अधिकारी गोगरे यांचेकरीता 5 हजार असे 10 हजार रुपयाची मागणी केली होती अशी माहिती तक्रारदार यांनी दिली.परंतू त्यानंतर कधीही सेवानिवृत्त विस्तार अधिकारी खंडाळे यांनी माझ्याकडे घरकूलाच्या हफत्यासाठी लाचेची मागणी न केल्याने मी त्यांचेविषयी तक्रार केली नाही.



Scanned with CamScanner

तेव्हा लोकसेवक सालगूडे हे खंडाळे व गोगरे (सेवानिवृत्त विस्तार अधिकारी) यांचेकरीता लाचेची मागणी करीत असल्याने विस्तार अधिकारी खंडाळे यांची खरोखरच लाचेची मागणी आहे अगर कसे याबाबत त्यांच्याकडे पडताळणी करणे आवश्यक असल्याने तक्रारदार यांनी त्याकरीता सहमती दिल्याने विस्तार अधिकारी खंडाळे यांची फोनदवारे पडताळणी करण्याचे ठरवून रेकॉर्डर चालु करुन तक्रारदार यांचे मोबाईल समोर धरला ती वेळी 13.52वा ची होती.त्यानंतर तक्रारदार यांनी त्यांचे मोबाईलचा स्पीकर ऑन करुनत्यांचा मोक्र9763520523 वरुन सेवानिवृत्त विस्तार अधिकारी खंडाळे यांचे मोबाईल क्रमांक 9970185185 वर फोन केला असता सेवानिवृत्त खंडाळे यांनी तक्रारदार यांना फोनवर म्हणाले कि,सोमवारी मी येणार आहे भोर ला होवु शकते का आपली भेटअसे म्हणाले त्यावर तक्रारदार सोमवारी का चालल कीत्यावर खंडाळे झाले ना तुमचे जमा झाले ना त्यावर तक्रारदार नाय नाय जमा झाले, आत्ता नको ना दयायला त्यांना असे विचारतात....पहिले ते पाच हजार रुपये मागतात खंडाळे साहेबांना दयायचेत अन गोगरे साहेबांना पाच हजार दयायचेत...माझ्याकडे दया म्हणत्यात ती त्यावर खंडाळे गोगरे साहेब आता गेले त्यांच काय नाय ...सोमवारी या भेटायला मी करील फोन तुम्हाला त्यावर तक्रारदार मग त्यांना सांगा ना आत्ताच सोडा पैसे संध्याकाळी म्हणुन ..घरकुलाचे हप्त्याचे त्यावर खंडाळे तक्रारदार यांना त्यालादोन एक हजार दिले का त्यावर तक्रारदार हे खंडाळे यांना आओ मी त्यांना पाच हजार कबुल केलेले आहेत.त्यांना देतो पाच हजार रुपये पण ते म्हणत्यात हयांचे दहा हजार रुपये दया त्यावर खंडाळे “एका की त्याला त्याचे दया” असे म्हणतात त्यावर तक्रारदार हे आओ ते घेनायेत तुमचे पाच हजार रुपये दिल्या शिवाय ...सकाळीच बोलणं झालं माझंत्यावर खंडाळे”नाय दया त्याला ...पाच हजार त्याला मी सांगतो त्याला. दया पाच हजार.. ते मी त्याला सांगतो, सोमवारी मी येतोच ये सोमवरी येवुन भेटा ..”असे बोलुन फोन कट करतात.

तेव्हा सेवानिवृत विस्तार अधिकारी खंडाळे यांनी तक्रारदार यांना सोमवारी भेटण्यास बोलाविले असल्याने पूढील कारवाई हि दि.13/04/26 रोजी सोमवारी करण्याचे ठरविले.त्यामूळे सदरदिवशीची कारवाई स्थगित केली व दि.13/4/2026 रोजी सकाळी 7.00 वाजता लाप्रवि कार्यालय पुणे येथे हजर राहण्याच्या पंचाना व सापळा पथकास सुचना दिल्या.सदर बाबत सविस्तर पंचनामा करणेत आला आहे.

दि.12/04/2026 रोजी तक्रारदारांना दि.13/04/26 रोजीच्या कारवाईच्या अनुषंगाने फोन केला असता तक्रारदार यांनी त्यांच्या गावची यात्रा असून त्यांना घरगूती अडचणी असल्याचे सांगूनपुढील कारवाई दि. 21/04/2026 रोजी करण्याबाबत विनंती केलेवरुन आम्ही पुढील कारवाई हि दि.21/04/2026 रोजी करण्याचे ठरवून सापळा पथकास व पंचास दि.21/04/2026 रोजी सकाळी 09.00 वाजता लाप्रवि कार्यालय पुणे येथे हजर राहण्याच्या सूचना दिल्या.

दि.21/04/26 रोजी सापळा कारवाई आजमावली असता लोकसेवक यांची भेट न झाल्याने सापळा कारवाई होवू शकली नाही.त्यामूळे सदरदिवशीची कारवाई स्थगित करुन पुढील पडताळणी कारवाई दि.22/4/2026 रोजी करण्याचे ठरवून त्यादिवशी सकाळी 10.00 वाजता पंचाना व तक्रारदार यांना सुचना दिल्या.सदर बाबत सविस्तर पंचनामा करणेत आला आहे.

आम्ही दिलेल्या सुचनेप्रमाणे दि.22/04/2026 रोजी दोन्ही पंच साक्षीदार व सापळा पथक असे सकाळी 10.00 वाजता ला.प्र.वि. पुणे कार्यालय येथे हजर झाले. त्यानंतर आम्ही सापळा कारवाईकामी आवश्यक असलेल्या साहित्यासह ला.प्र.वि. पुणे कार्यालयातुन 11.00वा शासकीय वाहन एम एच 12 एन यु 4109 ने रवाना होवून भोरपासूरेवरंधा रोडलगत असलेल्या शेतातजवळ आडोशाला थांबून तक्रारदार यांना फोन करुन कळविले.त्यानंतर थोडयाचवेळात तक्रारदार हे त्यांचे दुचाकीसह सदरठिकाणी हजर झाले.आम्ही तक्रारदार यांना शासकीय वाहनात बसविले. आम्ही तक्रारदार, पंच साक्षीदार व सापळा पथक यांना पुढील पडताळणी कारवाईचे अनुषंगाने सुचना दिल्या.

त्यानंतर आम्ही दोन्ही पंचांसमक्ष तक्रारदार सूर्वे यांना लाच रक्कम हजर करणेस सांगितले असता तक्रारदार यांनी त्यांचेकडील 5,000/- रुपये हजर केलेने सदर नोटांचे नंबर कागदावर लिहुन काढले त्यावर आम्ही व पंचांनी सहया केल्यात्यानंतर अॅन्थ्रासीन पावडरचे गुणधर्म समजावुन सांगुन व त्याचे प्रात्यक्षिक करुन दाखवून सदर नोटांना अॅन्थ्रासीन पावडर लाऊन नोटा तक्रारदार यांच्या शर्टच्या डाव्या खिशात ठेवल्या त्यानंतर तक्रारदार यांना लोकसेवक सालगुडे यांच्या ठावठिकाण्याबाबत मोबाईल स्पीकर वर ठेवून संपर्क करण्याचे ठरवून शासकिय व्हाईसरेकॉर्डर चालू करुन तक्रारदार यांच्या समोर धरला असता लोकसेवक सालगूडे यांनी तक्रारदार यांना भोरमधील पीडीसी बँक येथे भेटण्यास बोलाविले.त्याप्रमाणे आम्ही तक्रारदार यांना लोकसेवक सालगूडे यांची भेट घेण्यासाठी रवाना करण्याचे ठरवून व्हॉईस रेकॉर्डर 13.05वाजताचालू करून त्यामध्ये तक्रारदार,पंच क्र.1 श्री. बांदल व पंच क्र.2 श्री.खाडे यांची सापळा निवेदन ध्वनिमुद्रीत केले व त्याचे व्हिडीओ चित्रीकरण केले. त्यानंतर तक्रारदार व पंच क्रं 2 यांना सापळा कारवाईच्या अनुषंगाने सूचना देवून व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन लाऊन देऊन



Scanned with CamScanner

पंच क्रं 2 खाडे यांचेसह तक्रारदार यांच्या मोटारसायकलने लाचेच्या रक्कमेसह रवाना केले ती वेळ 13.15 वा ची होती. व त्यांचे पाठोपाठ आम्ही उर्वरित सापळा पथक व पंच क्रं 1 यांचेसह शासकीय वाहनाने पीडीसी बँकेकडे रवाना झालो.

आम्ही पीडीसी बँकेकडे जात असतानातक्रारदार व पंच क्र. 02 हे रस्त्यालगत एका स्नॅक्स च्या दुकानासमोर लाल रंगाच्या दुचाकीसह थांबलेल्या एका इसमाकडे पाहुन तक्रारदार हे त्यांचे वाहन थांबवुन सदर इसमाशी बोलु लागल्याने सदर इसमा सोबत आणखी एक व्यक्ती थांबलेला असल्याने आम्ही शासकिय वाहन रस्त्याच्या आडोशाला पार्क करुन थांबलो.काही वेळात त्यावेळी तक्रारदार व सदर इसम यांच्यात थोडा वेळ संभाषण झाले नंतर सदर इसम त्यांचेकडील दुचाकी वरुन सदर ठिकाणावरुन निघुन गेल्यानंतर आम्ही तक्रारदार यांचेजवळ जावून आम्ही पोशि आडके यांचेमार्फतीने तक्रारदार यांचेकडील व्हाईस रेकॉर्डर बंद केला ती वेळ 13.27 वा होतीत्यानंतर आम्ही शासकिय वाहनातून व तक्रारदार त्यांचेकडील दूचाकीने पंच क्रं 2 सह ज्याठिकाणाहून रवाना झालो त्याठिकाणी परत आलो.

आम्ही तक्रारदार सुर्वे यांचेकडे सापळा कारवाई दरम्यान घडलेल्या हकिकतबाबत विचारणा केली असता तक्रारदार यांनी हकिकत सांगितली की,मी व पंच क्र. 02 असे लोकसेवक सालगुडे यांना भेटण्यासाठी भोर गावातील पीडीसी बँकेच्या दिशेन जात असताना रस्त्यामध्येच लोकसेवक सालगुडे स्नॅक्स च्या दुकानाबाहेर थांबल्याचे मी पाहिले त्यामुळे मी व पंच क्र. 02 असे लोकसेवक सालगुडे यांच्याजवळ गेलो व सालगूडे यांना मी "माझे तेवढं काम करा" असे बोललो असता लोकसेवक सालगुडे यांनी "तेवढं सगळं बोललेलं करा माझं"असे मला बोलले त्यावर मी त्यांना देतो ना असे बोलुन माझ्या शर्टच्या खिशाकडे इशारा करुन लाच रक्कम आणल्याचे सांगितले त्यावेळी लोकसेवक सालगुडे यांनी "पधरा येत का, आता ही" असे विचारले असता मी मानेने नाही असा इशारा करुन पाच हजार असल्याचे हाताच्या बोटांनी इशा-याने सांगुन"आता एवढं मान्य करा मी तुमचं सगळं करतो"े अशी विनंती केली असता त्यावर लोकसेवक सालगुडे यांनी "नाय पाच हजारात नाय होणार"असे बोलुन पुर्ण रक्कम करावी लागेल नाहीतर मी तोंडघशी पडेल असे मला म्हणाले त्यावर मी त्यांना "त्यांच बाकीचांच राहुदया आता तुमचं फक्त बघा" असे बोललो असता लोेकसेवक सालगुडे यांनी "नको तुम्ही करा संध्याकाळी मला असे सांगुन आणखी थोडी चर्चा करुन लाच रक्कम न स्विकारता त्याचे सोबत असलेल्या इसमा सोबत निघुन गेले.अशी हकीकत तक्रारदार यांनी सांगितली त्यानंतर आम्ही पंच क्र. 02 खाडे यांना घडलेल्या हकिकत बाबत विचारणा केली असता त्यांनी देखील तक्रारदार सुर्वे यांचे प्रमाणे मिळतीजुळती हकिकत सांगितली.

लोकसेवक सालगुडे यांनी पाच हजार लाचेची रक्कम न स्विकारता स्वत:करीता पाच हजार व सेवानिवृत्त विस्तार अधिकारी(खंडाळे व गोगरे)यांचेसाठी प्रत्येकी 5000/-रुपये प्रमाणे 10,000/- अशी एकुण 15,000/- लाचेची रक्कम घेवुन संध्याकाळी गवडी गावात बोलाविले असल्याने तक्रारदार सुर्वे यांचेकडे अधिकच्या दहा हजार रुपयांच्या लाच रक्कमेबाबत विचारणा केली असता तक्रारदार यांनी त्यांच्याकडे अधिकची रक्कम नसल्याचे पंचासमक्ष सांगितले.त्यामुळंे लाच रक्कम म्हणुन खेळण्यातील 500/- रुपये असे लिहलेल्या 20 नोटांचा लाचरकमेच्या नोटांमध्ये समावेश करुनसापळा कारवाई आजमावण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले.त्यानंतर सदर नोटांना अँथ्रासिन पावडर लावून तक्रारदार यांच्या शर्टच्या डाव्या खिशात ठेवल्या.त्यानंतर काही काळ वाट पाहून लोकसेवक यांचे ठावठिकाण्याबाबत माहिती घेण्याकरीता तक्रारदार यांच्या मोबाईलवरुन लोकसेवक सालगूडे यांना कॉल केला असता लोकसेवक सालगुडे यांनी तक्रारदार यांचा कॉल उचलला नाही सदर कॉल शासकिय व्हाईस रेकॉर्डरमध्ये रेकॉर्ड करण्यात आला आहे.त्यामूळे पुढील सापळा कारवाई दि.23/04/2026 रोजी करण्याचे ठरवून सदरबाबत तक्रारदार व सापळा पथकास सुचना देण्यात आल्या.सदरबाबत सविस्तर पंचनामा करण्यात आला आहे.

दि.23/04/26रोजी सापळा कारवाई आजमावली असता लोकसेवक मिळून न आल्याने सापळा कारवाई होवू शकली नाही.त्यामूळे सदरदिवशीची कारवाई स्थगित करुन पुढील सापळा कारवाई हि लोकसेवक सालगूडे तक्रारदार यांना संपर्क करतील तेव्हा करण्याचे ठरवून तशा पंचाना व सापळा पथकास सुचना देण्यात आल्या .सदर बाबत सविस्तर पंचनामा करणेत आला आहे.

दि.18/05/2026रोजी तक्रारदार यांनी आम्हांला संपर्क करुन लोकसेवक सालगूडे हे दि.19/5/2026 रोजी शिंद ग्रामपंचायत मध्ये मिंटीगकरीता येणार असल्याने सदरदिवशी ते शिंद गावात माझ्याकडून लाच रक्कम स्विकारण्याची शक्यता असल्याचे सांगितलेवरुन आम्ही सापळा कारवाई दि.19/05/2026 रोजी करण्याचे ठरवून त्याप्रमाणे सापळा पथकास व पंचास सुचना दिल्या.

आम्ही दिलेल्या सुचनेप्रमाणे दि.19/05/2026 रोजी दोन्ही पंच साक्षीदार व सापळा पथक असे सकाळी 08.00 वाजता ला.प्र.वि. पुणे कार्यालय येथे हजर झाले.त्यानंतर आम्ही सापळा कारवाईकामी आवश्यक असलेल्या साहित्यासह ला.प्र.वि. पुणे कार्यालयातुन 08.30वा शासकीय वाहन एम एच 12 यूसी 4109 ने रवाना होवून



Scanned with CamScanner

भोरपासूरेवरंधा रोडलगत असलेल्या शेतातजवळ आडोशाला थांबून तक्रारदार यांना फोनकरुन बोलवून घेतले. त्यानंतर थोडयाचवेळात तक्रारदार हे त्यांचे दुचाकीसह सदरठिकाणी हजर झाले.आम्ही तक्रारदार यांना शासकीय वाहनात बसविले.तक्रारदार यांना आम्ही सापळा पथकात नव्याने हजर असलेले शासकिय वाहनाचे चालक पोहवा 6894 सोनवणे यांची ओळख करुन देवून तक्रारदार यांना ग्रामीण भाग असल्याने सापळा कारवाईकरीता एक दूचाकी उपलब्ध करण्यास सांगितली असता तक्रारदार यांनी त्यांचेकडील मोटारसायकल क्रं एमएच 12 पीपी 1305 हि उपलब्ध करुन दिली.त्यानंतर आम्ही तक्रारदार,पंच साक्षीदार व सापळा पथक यांना दि.22/04/26 व दि.23/04/26 रोजीच्या कारवाईची उजळणी करुन दिली.

त्यानंतर आम्ही दि.22/04/2026 रोजीच्या सापळा कारवाई दरम्यान एका लखोटयात बंद केलेली लाचेची 15000/-रुपयाची रक्कम(5000/-भारतीय चलनाच्या 500 रुपये दराच्या 10 नोटा व खेळण्यातील 500 रुपये लिहिलेल्या 20 नोटा) बाहेर काढून सदर रक्कमेच्या नोटांच्या नंबरची व नोंटाना अॅन्थ्रासीन पावडर असल्याची तक्रारदार व पंचाना खात्री करुन देवूनतक्रारदार यांच्या शर्टच्या डाव्या खिशातठेवल्या.त्यानंतर सापळा कारवाईचे अनुषंगाने प्रथम तक्रारदार सूर्वे त्यानंतर दोन्ही पंचांचे निवेदन घेतले ती 10.31 वा ची वेळ होती.त्याचे व्हिडीओ चित्रीकरण करण्यात आले आहे.त्यानंतर योग्य त्या सुचना देऊन तक्रारदार यांना व्हॉईस रेकॉर्ड चालु करुन लाऊन देऊन पंच खाडे यांचेसह लाचेच्या रक्कमेसह शिंद ग्रामपंचायत येथे रवाना केले ती वेळ 10.46 वा ची होती.त्या पाठोपाठआम्हीसापळा पथक शासकिय वाहनाने रवाना झालो.त्यानंतर थोडया वेळाने तक्रारदार हे पुर्व नियोजीत इशारा न करता पंच यांचेसह त्यांचेकडील दूचाकी त्याठिकाणाहून निघून गवडी गावाकडे जावून थांबले तेव्हा आम्ही सापळा पथक हि तक्रारदार यांच्याजवळ जावून तक्रारदार यांचेकडील व्हाईस रेकॉर्डर बंद केला ती वेळ 11:12 ची होती.त्यानंतर तक्रारदार यांना आम्ही हकिकत विचारली असता तक्रारदार यांनी सांगितले की, ते पंच क्रं 2 यांचेसह लाच रक्कम देणेसाठी शिंद ग्रामपंचायत येथे गेले असता सदर ठिकाणी लोकसेवक सालगूडे हे उपस्थित होते.तेव्हा सालगूडे यांना मी "जाऊदया तुमच्या म्हणण्या प्रमाणे अॅडजस्ट झालयं...माझा फक्त हप्ता सोडा आता..देणे ये लोकांचा देवुन टाकतो....ती विषय कट करुन टाकतो" असे म्हणालो असता सालगूडे हे मला "येतो की मग मी जाताना घरी"असे म्हणाले अशी तक्रारदार यांनी हकिकत सांगितली तेव्हा आम्ही पंच क्रं 2 यांच्याकडे विचारणा केली असता पंच क्रं 2 यांनीही तक्रारदार यांच्याप्रमाणे हकिकत सांगितली.

त्यानंतर तक्रारदार यांचे घर गवडी गावाच्या मुख्य रोडलगतच असल्याने आम्ही पुढील कारवाई तक्रारदार यांच्या घरीच करण्याचे ठरवून त्याप्रमाणे तक्रारदार,पंच क्रं 2 व पोशि आडके यांना सापळा करवाईच्या अनुषंगाने सुचना देवून तक्रारदार यांच्या घरी थांबण्यास सांगितले व आम्ही सापळा पथक तक्रारदार यांच्या घराच्या आडोशाला थांबून राहिलो.त्यानंतर तक्रारदार हे त्यांचे घराबाहेर लोकसेवक सालगूडे यांची वाट पाहत थांबलेले असताना तक्रारदार यांना लोकसेवक सालगूडे हे त्यांच्याकडील दूचाकीने एका इसमासोबत भोरच्या दिशेने जाताना दिसले.तेव्हा आम्ही लोकसेवक सालगूडे यांना स्पीकर ऑन करुन फोन करण्याचे ठरवून व्हाईस रेकॉर्डर चालू करुन तक्रारदार यांच्या मोबाईल पुढे धरला असता तक्रारदार यांनी लोकसेवक सालगूडे यांनी तक्रारदार यांनाआंब्याच्या झाडाखाली एकटेचयेण्यास सांगितले असल्यानेतक्रारदार यांना लोकसेवक सालगूडे यांचेकडे सापळा कारवाईकामी त्यांच्या दूचाकीने एकटेच जाण्याची सुचना देवून लाच रकमेसह व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन लाऊन देऊन रवाना केलेती वेळ 12.57 वा ची होती. व त्यांचे पाठोपाठ दूचाकी क्र एमएच 12 पीपी 1305 वरुन पोशि आडके,पोशि तावरे व पंच क्रं 2 यांना रवाना केले व त्यांचेपाठोपाठ आम्ही उर्वरित सापळा पथक पंच क्रं 1 यांचेसह शासकिय वाहनातून रवाना झालो.तक्रारदार हे लाच रक्कम देणेकामी रवाना झालेनंतर किवत गावाच्या हददीत भोर मोहूर्डे रोडलगत आंब्याच्या झाडाखाली तक्रारदार यांनी त्यांची गाडी थांबवलेली दिसताच पोशि तावरे व पोशि आडके यांनी त्यांचेकडील दूचाकी थांबवून ते पंच क्रं 2 यांचेसह तक्रारदार दिसतील एवढया अंतरावर थांबून राहिले व आम्ही उर्वरित सापळा पथक तक्रारदार थांबलेल्या ठिकाणाहून काही अंतर पूढे तक्रारदार दिसतील अशाबेताने जावून थांबलो. तेव्हा तक्रारदार हे दोन इसमांसोबत बोलत असल्याचे आम्हाला दिसत होते त्यानंतर काही वेळाने तक्रारदार यांनी त्यांच्या डोक्यावरील टोपी काढून लाच रक्कम स्विकारलेचे पुर्व नियोजीत इशारा केला असता तेव्हा मागे थांबलेले पोशि तावरे ,पोशि *आडके व पंच 2 तसेच पूढे थांबलेलेआम्ही सापळा पथक त्याठिकाणी पोहचलो.त्यावेळी तक्रारदार यांनी* दाखविल्याप्रमाणे तेथे असलेल्या दोन्ही इसमांना आम्हीताब्यात घेतले.सदर वेळी पोशि आडकेयांनी तक्रारदार यांचेकडील व्हॉईस रेकॉर्डर ताब्यात घेऊन बंद केला ती वेळ 13.07 वा ची होती.सदर वेळी पोशि तावरे यांनी व्हिडीओ रेकॉर्डीग सुरु केले.

त्यानंतर तक्रारदार व पंच क्र.02 यांना लाचेच्या रक्कमेबाबत विचारले असता तक्रारदार यांनी लोकसेवक सालगूडे यांनी त्यांचेसोबत असलेल्या इसमाकडे लाचेची रक्कम देण्यास सांगितल्याने लाचेची रक्कम त्यांच्याकडे दिली असून ती त्यांनी पँटच्या उजव्या खिशात ठेवली असल्याचे सांगितले.तेव्हा आम्ही सदर इसमास त्यांचे नाव



Scanned with CamScanner

पत्ता विचारले असता त्यांनी त्यांचे नाव किसन रामचंद्र ठोसर वय 52 वर्षे व्यवसाय शेती रा.मु.पो.शिंद ता.भोर जि. पुणे असे सांगितले.त्यानंतर किसन ठोसर यांना विचारणा केली की, तक्रारदार सूर्वे यांचेकडून स्विकारलेल्या लाचेची रक्कम कोठे आहे? त्यावेळी खाजगी इसम किसन ठोसर यांनी सदरची लाच रक्कम त्यांच्या पॅटच्या उजव्या खिशातून काढून दिली असता आम्ही दिलेल्या पुर्व सुचनेप्रमाणे पंच क्र.01 श्री.बांदल यांनी लाचेची रक्कम ताब्यात घेवून मोजली असता त्यामध्ये भारतीय चलनातील 500 रुपये किमतीच्या 10 नोटा म्हणजेच 5,000/- रुपये व उर्वरीत खेळण्यातील 500 रुपये लिहीलेल्या 20 नोटा असे एकुण 15000/-रुपये असल्याचे दिसून आले.त्यानंतर सदर नोटांचे सापळापुर्व कारवाई दरम्यान कागदावर लिहून ठेवलेल्या नोटांच्या नंबरशी खात्री केली असता तंतोतंत जुळून आले.त्यानंतर लोकसेवकास त्याचे नाव विचारले असता त्यांनी त्यांचे नाव महादेव नामदेव सालगुडे वय 48 वर्षे पद-ग्रामविकास अधिकारी,ग्रामपंचायत गवडी,तालूका भोर जिल्हा.पुणे सध्या राहणार रास्तेज सोसायटी,सी ं िवंग,सातवा माळा,भोलावडे,तालूका भोर जि.पुणे असे सांगितले.त्यानंतर आमचे सुचनेवरुन खाजगी इसम किसन ठोसर व लोकसेवक महादेव सालगूडे यांना शासकिय वाहनात घेऊन कृत्रीम अंधार करुन अल्ट्राव्हॅायलेट दिव्याच्या सहाय्याने खाजगी इसम किसन ठोसर यांचे दोन्ही हाताची तपासणी केली असता त्यांच्या दोन्ही हाताला अॅन्थ्रॅासीन पावडरची फिक्कट निळसर रंगाची चकाकी दिसून आली.त्यानंतर किसन ठोसर यांच्या पॅटच्या उजवा खिश्याची तपासणी केली असता सदरठिकाणी फिक्क्ट निळसर रंगाची चकाकी दिसून आली त्यानंतर पंच क्र.1 श्री. बांदल यांचे हातास अॅन्थ्रॅासीन पावडरची फिक्कट निळसर रंगाची चकाकी दिसून आली कारण त्यांनी सापळा यशस्वी झालेनंतर लाच रक्कम खाजगी इसमाकडून ताब्यात घेतली होती.त्यानंतर तक्रारदार यांचे हात व शर्टाची तपासणी केली असता तक्रारदार यांच्या उजव्या हाताला व शर्टाच्या खिशाला ही फिक्क्ट निळसर रंगाची चकाकी दिसून आली.त्यानंतर आम्ही लोकसेवक सालगूडे व खाजगी इसम किसन ठोसर यांना ताब्यात घेतले.त्यानंतर आम्ही तक्रारदार श्री.सूर्वे यांना सापळा कारवाई दरम्यान घडलेल्या घटनेबाबत विचारणा केली असता त्यांनी घडलेल्या घटना क्रमानुसार वरीलप्रमाणे सविस्तर हकिकत सांगितली सदर बाबत सविस्तर पंचनामा करणेत आला आहे.

तरी तक्रारदार अरविंद सूर्वे यांनी दि.06/04/2026 रोजी दिलेल्या लेखी तक्रारीच्या अनुषंगानेदि.06/04/2026, दि.8/04/2026,दि.09/04/26,दि.21/04/26,दि.22/04/26,दि.23/04/26रोजी करण्यात आलेल्या पडताळणी कारवाई दरम्याण दि.09/04/26 रोजीच्या पडताळणी कारवाई दरम्याण लोकसेवक महादेव सालगूडे यांनी तक्रारदार यांचेकडे त्यांच्या घरकूलाचा दूसरा हफता खात्यामध्ये जमा करण्यासाठी सेवानिवृत्त विस्तार अधिकारी खंडाळे व सेवानिवृत विस्तार अधिकारी गोगरे यांच्याकरीता प्रत्येकी 5000 रुपये असे दोघंासाठी एकूण 10000/-रुपये व स्वत:करीता 5000/-रुपयाची लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले.त्यानंतर सेवानिवृत्त विस्तार अधिकारी खंडाळे यांच्याकडे पडताळणी केली असता सेवानिवृत्त विस्तार अधिकारी खंडाळे यांनी तक्रारदार यांना ग्रामविकास अधिकारी सालगुडे यांना 5000 रुपये लाच देण्यास प्रोत्साहन दिले दि.22/04/2026 रोजीच्या कारवाई दरम्यान लोकसेवक महादेव सालगूडे यांनी खंडाळे व गोगरे(सेवानिवृत्त विस्तार अधिकारी) यांना प्रत्येकी 5000/-रुपये असे दोघांचे 10000/- रुपयाची व त्यांचे स्वत:करीता5000/-रुपये असे एकूण तक्रारदाराकडे 15000/-रुपयाची लाच मागणी करुन दि.19/05/26 रोजी सापळा कारवाई दरम्यान लोकसेवक सालगूडे यांनी मागणी केल्याप्रमाणे तक्रारदार सूर्वे यांनी लाचेची 15000/-रुपये लोकसेवक सालगूडे यांना देवू केली असता लोकसेवक सालगूडे यांनी तक्रारदार यांना लाचेची 15000/- रुपये रक्कम लोकसेवक सालगूडे यांचेसोबत असलेल्या खाजगी इसम किसन ठोसर यांच्याकडे देण्यास सांगितलेवरुन तक्रारदार यांनी ती आरोपी खाजगी इसम किसन ठोसर यांना सूपूर्द केली असता खाजगी इसम ठोसर यांनी तक्रारदारांकडून 15000/-रुपयाची लाचेची रक्कम स्विकारल्याने लोकसेवक महादेव सालगूडे व खाजगी इसम किसन ठोसर यांना ताब्यात घेण्यात आले असुन त्यांचे विरुध्द तसेच याकारवाई दरम्याण दत्तात्रय दादा खंडाळे वय 58 वर्षे सेवानिवृत्त विस्तार अधिकारी रा. बारामती यांनी तक्रारदार यांना लोकसेवक सालगूडे यांना लाच देण्यास प्रोत्साहन केल्यानेत्यांचेविरुध्द भोर पोलीस स्टेशन पुणे ग्रामीण येथे भ्र.प्र.अधि.1988 कलम 7,12 प्रमाणे माझी कायदेशिर फिर्याद आहे.

माझा वरील फिर्यादी जबाब माझे सांगणे प्रमाणे टंकलिखीत करण्यात आला असून तो मी वाचून पाहीला असून बरोबर आहे.



Scanned with CamScanner

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

Anna Manyaba Pawar(I (Inspector)) / **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

***R.O.A.C.***(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पोलीस ठाणे अंमलदार

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): Anna Manyaba Pawa
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.):



Scanned with CamScanner

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र)**: Physical features, deformities and other details of the ( If known / seen )**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्ट्ये, व्यंग आणि इतर तपशील))

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म तारीक/ वर्ष) | Build (बांधा) | Height (cms.) (उंची(सें. मी.)) | Complexion (रंग) | Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |
| 2 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |
| 3 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा / बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्या ा खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)



Scanned with CamScanner